“शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सेवा सुविधा चा मूल्यमापनात्मक अभ्यास”
(विशेष संदर्भ:- किनवट प्रकल्प)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. आंतरविद्याशाखे अंतर्गत समाजकार्य विषयातील विध्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन पूर्व शोध आराखडा

• संशोधक विद्यार्थी •

राजरत्न निवृत्तीराव पवार

(M.S.W.)

ई-मेल-raj.pawar225@gmail.com

मोबाईलनं. 8888245202

प्रवर्ग: एससी

• संशोधन मार्गदर्शक •

प्रा. डॉ. मेघराज ए. कपुरडेरिया

(सहयोगी प्राध्यापक)

Email – meghrajkapoor@gmail.com

फोन. नं. 9421855800

जवहारलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको नांदेड.

• संशोधन केंद्र•

जवहारलाल नेहरू समाजकार्य महाविध्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नांदेड.

डिसेंबर-२०२४

“शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सेवा सुविधा चा मूल्यमापनात्मक अभ्यास”

(विशेष संदर्भ:किनवट प्रकल्प)

प्रास्ताविक:

भारत देश हा ५००० वर्ष प्राचीन संस्कृती असलेला, संस्कृती संपन्न देश म्हणून जग भरात ओळखला जातो. भारतात अनेक जातीधर्म व जमातीचे लोक राहतात. त्या पैकी एक महत्वपूर्ण व प्राचीन जमात म्हणजे आदिवासी जमात होय. भूतलावरील प्रत्येक समुदायाला त्यांच्या उत्पत्तीच्या संदर्भात काहीना काही धार्मिक व सामाजिक पार्श्वभूमी आहे. तशीच आदिवासींच्या उत्पत्तीला ही काही पार्श्वभूमी आहे. आदिवासी हा इंग्रजीतील अबॉरीजीनिझ (Aborigines) या मूळ शब्दाचा मराठी पर्यायी शब्द आहे. तर आदिवासींचा भारतीय राज्यघटनेत कलम ४६ अंतर्गत अनुसूचित जमात (Schedule Tribe) असा उल्लेख केलेला आहे.तर भारतीय संविधाना मध्ये अनुसूचित जातीची व्याख्या अनुच्छेद ३६६ (२५) नुसार अनुसूचित जमाती म्हणजे असा समुदाय कि जो घटनेच्या कलम ३४२ नुसार अनुसूचीत जमाती म्हणून घोषित केलेला आहे. कलम 46 अंतर्गत राज्य घटनेतील दुर्बल घटक आणि विशेष अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचे आर्थिक व शैक्षणीक हित संवर्धनासाठी राज्य विशेष काळजी करेल तसेच सामाजिक न्याय व सर्व प्रकारच्या संरक्षणापासून त्यांचे संरक्षण करेल.

२००१ च्या जनगणने नुसार भारताची एकुण लोकसंख्या १०२.८७ कोटी इतकी होती. त्यापैकी आदिवासी लोकसंख्या ८.४३ कोटी इतकी होती. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के इतके आदिवासी भारतात होते. २०११ च्या जनगणने नुसार एकूण लोकसंख्ये सोबत आदिवासी लोकसंख्या देखील वाढलेली दिसते. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकुण लोकसंख्या १२१.०१ कोटी इतकी आहे. तर आदिवासी लोकसंख्या १०.४२ कोटी म्हणजेच एकुण लोकसंख्येच्या ८.६१ टक्के इतकी आहे. महाराष्ट्रात १९८१ साली एकूण लोकसंख्या ६.२७ कोटी इतकी होती, त्या पैकी आदिवासी लोकसंख्या ५७.७२ लाख हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ९.९१ टक्के इतके होते.[१]

१९९१ साली महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ७.८९ कोटी इतकी होती त्यात आदिवासी लोकसंख्या ७३.१८ लाख इतकी होती. हे प्रमाण ९.२७ टक्के इतके होते तर, २००१ साली ९.६८ कोटी इतक्या एकूण लोकसंख्येत ८५.७७ लाख इतकी आदिवासी लोकसंख्या होती. हे प्रमाण ८.८५ टक्के इतके आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२३ कोटी इतकी आहे. त्या पैकी आदिवासी लोकसंख्या १.०५ कोटी इतकी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के इतके आहे. महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्ह्यां पैकी १४ जिल्ह्यांमध्ये आदिवासी जमात मोठ्या प्रमाणात आढळून येते. त्यात आदिवासी

लोकसंख्या नांदेड जिल्ह्यामध्ये देखील आहे , नांदेड मध्ये आदिवासी समुदाय हा किनवट, माहूर, हिमायतनगर, भोकर, आदी तालुक्या मध्ये एकवटलेला आहे.

महाराष्ट्रात आदिवासींच्या ४५ मुख्य जमाती आहेत. त्यात मुख्यत्वेकरून भिल्ल, गोंड, महादेवकोळी, पावरा, ठाकूर, वरील प्रमुख आदिवासी जमाती आहेत. त्या प्रत्येक जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन, चालीरीती, धार्मिकता यांच्यात साम्यता आढळत नाही. या प्रत्येक जमाती मध्ये विभिन्न वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमाती चा मानसिक पिंड हा त्यांच्या सभोवतालच्या नैसर्गिक, भौगोलिक,आर्थिक आणि पारंपरिक रूढीने बनलेला आहे. असे असले तरी सर्व सामान्य आदिवासींचे जीवन, त्यांची मूल्ये आणि वैशिष्ट्ये यांच्यात काही बाबतीत साम्यता आढळते.

भारता सारख्या लोकशाही देशात प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास करण्याची समानसंधी भारतीय राज्यघटनेने दिलेली आहे. तथापी, भारताच्या डोंगराळ व दुर्गम भागात राहणा-या आदिवासी समाजापर्यंत विकासाची गंगा पोहचावी या साठी खाजगी, शासकीय व निमशासकीय स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. या विविध संस्था व केंद्र व राज्यशासनाच्या प्रयत्नांमुळे आदिवासी जमात मुख्य प्रवाहात येताना काही प्रमाणात दिसत आहे. मात्र असे असले तरी संपूर्ण आदिवासी समाजाचा समाधानकारक विकास झालेला आढळून येत नाही. त्यांच्या विकास कार्यासाठी अनेक संस्था व शासन भारत स्वातंत्र्यापासून कार्यरत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी जमातीच्या विकासासाठी केंद्र सरकार व राज्यसरकारे सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.[२]

सरकार द्वारे स्वतंत्र आदिवासी महामंडळा मार्फत विकासाच्या विविध योजना सातत्याने पूर्णपणे राबविन्याच्या पर्यंत केला जात आहेत. यांत काही योजना यशस्वी झालेल्या दिसतात तर काहींना अपयशही आलेले दिसते. त्यांच्या विकास कार्यासाठी अनेक संस्था व शासन स्वातंत्र्या पासून कार्यरत आहेत त्यांच्या कार्याचा व त्यांच्या मार्फत अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विकासात्मक योजनांचा परिणाम आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्याच्या विकासावर होतो का? होत असल्यास तो कसा झाला आहे? या विषयीचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधातून नांदेड जिल्ह्यातील किनवट प्रकल्पा पुरता करण्यात येणार आहे.

आदिवासी जमातीची व्याख्या:-

इंग्रजी मध्ये ट्रायबल (Tribal) म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्यांना आदिम, रानटी टोळीवाले, आदिवासी समाज व जमाती, तर भारतीय संविधानानुसार (राज्यघटने नुसार) त्यांच्यासाठी अनुसूचित जमाती इत्यादी विविध नावांनी संबोधिले जाते. आदिवासी जमाती व समाजयांची संज्ञा स्पष्ट होण्यासाठी विविध समाजशास्त्रज्ञ, मानववंशतज्ज्ञ व सरकार यांनी आदिवासी जमातीच्या व्याख्या केल्या आहेत. त्या पैकी काही व्याख्या पुढील प्रमाणे अभ्यासता येतील.

१. डॉ. डी.एन. मुजुमदार :

"आदिवासी टोळी म्हणजे सामान्य पणे एकच नाव धारण करणाऱ्या विशिष्ट भूभागावर निवास करणाऱ्या एका च प्रकार ची बोली बोलणाऱ्या, विवाहसंबंध,व्यवसाय इत्यादी बाबतीत एकाच प्रकारचे नियम पाळणाऱ्या निश्चितपणे एका विशिष्ट प्रकारची मूल्ये व विचार प्रणाली यांची जपवणूक करणाऱ्या कुटुंबांचा समूह होय."

२. जेकब आणि स्टर्न :

"समान भूप्रदेश, समान भाषा, समान संस्कृती यांचा अवलंब करणाऱ्या आणि आर्थिक दृष्ट्या एकमेकांशी अत्यंत निगडीत व परस्पर संबंधित धाग्यांनी विणलेल्या खेड्यांचे एकत्र अशा वस्तीचा उल्लेख पुष्कळदा टोळी किंवा आदिवासी समाज म्हणून केला जातो."

३. गिलीन आणि गिलीन :

"एका विशिष्ट भू-भागावर राहणारा, समान बोली भाषा व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुदायाला आदिवासी समाज असे म्हणतात."

४. डॉ. रिव्हर्स:

"ज्या समुदायातील सर्व सदस्य एक समान बोली भाषा बोलतात. युध्द वगैरे सारख्या उद्दिष्ट्य पूर्तते करिता एक होऊन झटतात, अशा सरळ साध्या सामाजिक समूहाला आदिवासी असे म्हणतात."

५. शासकीय व्याख्या:

'भारतीय संविधान, अनुच्छेद ३६६ (२५) ने अनुसूचित जमातींना अशा आदिवासी किंवा आदिवासी समुदायांच्या किंवा अशा जमाती किंवा आदिवासी समुदायां मधील गटांचा भाग म्हणून परिभाषित केले आहे, ज्यांचा अनुच्छेद ३४२ अंतर्गत या संविधानाच्या उद्देशाने अनुसूचित जनजाती म्हणून मागणी केली आहे.

वरील सर्व व्याख्यां वर दृष्टिक्षेप टाकला असता असे लक्षात येते की, यां मध्ये आदिवासी समाजाची बोली भाषा, राहण्याचे ठिकाण, स्वभाव, संस्कृती, विवाहसंबंध,व्यवसाय अशा विविध वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

आश्रमशाळे विषयी माहिती:

आश्रमशाळा समुहयोजनेचा उद्देश-राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणा-या जनतेची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन 1972-73 पासून क्षेत्र विकासाचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला. अशा भागाचा मूलभूत विकास व्हावा आणि त्याचा फायदा सर्वांना व्हावा या साठी तेथे मूळ केंद्रस्थान म्हणून आश्रमशाळा असावी हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यानंतर १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले.

दि-२२ एप्रिल १९८३ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे.[३]

आश्रमशाळा मंजुरी निकष लोकसंख्या:

डोंगराळ भागात 5000 ते 7000 आदिवासी लोकवस्तीसाठी एक आश्रमशाळा आणि दुर्गम भागात 2000 ते 3000 लोकवस्तीसाठी एक आश्रमशाळा मंजूर करण्यात येते.

आश्रम शाळांची संख्या:

आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण 552 शासकीय आश्रमशाळा मंजूर आहेत.त्यापैकी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 412 तर आदिवासी उपयोजना क्षेत्रा बाहेरील 140 शासकीय आश्रम शाळा आहेत. तथापि मंजूर पैकी 529 आश्रम शाळा कार्यरत आहेत. 529 शासकीय आश्रम शाळां पैकी 11 इंग्रजी माध्यमा च्या शाळा असून, 25 कन्या शाळा आहेत.[४]

विद्यार्थी संख्या:

सदर शासकीय व निमशासकीय आश्रमशाळां मध्ये सन 2020-23 मध्ये एकूण 187392 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्या पैकी 94588 मुले तर 98804 मुली आहेत.

विद्यार्थांना पुरविण्यात येणा-या सोईसुविधा:

शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थीना अन्न धान्य, मसाले, किराणामाल, दुधअंडी, केळी, फळे, शालेय गणवेश, खोबरेल तेल, आंघोळीचा व कपडे धुण्याचा साबण, टुथपेस्ट, टुथब्रश, सॅनेटरी नॅपकिन (मुलींसाठी), बुट, पायमोजे, रेनकोट, शालेय शैक्षणिक साहित्य (पाठयपुस्तके, व लेखन सामुग्री) पुरविण्यात आलेली आहेत आहार, कपडे, शालेय व इतर साहित्य शासना मार्फ़त पुरविण्यात येते. खरेदीसाठी वेळो वेळी शासन निर्णय निर्गमीत केले असून अलिकडे दि.10.03.2016 च्या शासन निर्णयान्वये सर्व समावेशक सूचना देण्यात आलेल्या आहेत.त्यात खरेदी बाबत सविस्तर कार्य पद्धती विहीत करण्यात आलेली असून 4 समित्यां मार्फत खरेदी करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.(५)

शाळा व्यवस्थापन समिती :-

आश्रमशाळा मधील दैनंदिन व्यवस्थापन व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी तसेच त्यावर संनियत्रण ठेवण्यासाठी आश्रमशाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यां मध्ये अध्यक्षासहीत 75 टक्के सदस्य पालकां मधून निवडले आहेत. सदर शाळा व्यवस्थापन समित्यांना आश्रम शाळांच्या किरकोळ दुरूस्त्यांसाठी रू.1.00 लक्ष पर्यंत निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्व:

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची लोकसंख्या ८५.७७ लाख इतकी होती. ही लोकसंख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के इतकी होती. तर

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या आता १.०५ कोटी इतकी झाली आहे. म्हणजेच आदिवासी लोकसंख्येत २००१ ते २०११ या दहा वर्षात २२.५३ टक्के वाढ झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे.

सन १९९१ ते सन २०११ या दोन दशकातील भारतातील आदिवासी समाजातील लोकसंख्येचे एकूण लोक संख्येशी असणारे प्रमाण व त्याचे होणारे बदल दर्शविले आहेत. १९९१ ते २०११ या दोन दशकात कर्नाटक व हिमाचलप्रदेश या राज्यांचे आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण हे वाढलेले दिसते. १९९१ साली ते प्रमाण पाच टक्के पेक्षा कमी होते ते वाढून पाच ते दहा टक्के झाले आहे. तसेच, मध्य प्रदेश राज्यात १९९१ साली आदिवासी लोकसंख्या १० टक्के ते २०टक्के होती ते प्रमाण २००१ व २०११ साली २० टक्के ते ४० टक्के पर्यंत वाढले. थोडक्यात, आदिवासी लोक संख्येत प्रत्येक जनगणनेत वाढ होताना दिसते म्हणूनच, आदिवासींच्या विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर केंद्र शासनामार्फत व राज्यस्तरावर राज्यसरकार मार्फत स्वतंत्रपणे शासकीय योजना राबविल्या जात आहेत.

आदिवासी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे वर्गीकरण ढोबळ मानाने पाच गटात केले जाते, शैक्षणिक विकासाच्या योजना, शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या योजना, रोजगार व स्वयंरोजगार योजना, आर्थिक उन्नतीच्या योजना, सामाजिक विकासाच्या योजना इत्यादी स्वातंत्र्याची जवळपास ७० वर्ष उलटून गेल्यानंतर ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या तुलनेत आदिवासी जमातीचा समाधानकारक विकास झालेला आढळून येत नाही. कारण आदिवासी जमातीच्या समस्याया सामान्य जनतेच्या समस्यांपेक्षा वेगळया स्वरूपाच्या आढळून येतात. ही बाब लक्षात घेऊन आदिवासी जमातीच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी भारतसरकार कार्यरत आहे. व अनेक विकासाधिष्टीत योजना राबवत आहे. या योजना आदिवासी जमाती पर्यंत पोहचतात का? त्यांचा प्रत्यक्ष लाभ त्यांना किती प्रमाणात होतो? त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा होते का? हे अभ्यासणे महत्वाचे आहे. त्या साठी महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्याच्या किनवट प्रकल्पातील आश्रम शाळेतील आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक योजनांच्या यशपयाशा विषयीचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

समाजकार्य संशोधन पद्धती:-

किनवट प्रकल्पातील शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या विध्यार्थ्यांना शासनाना द्वारे मिळणाऱ्या सेवासुविधाच्या अनुसंघाने प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी पुढील संशोधन पद्धतीच्या अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निर्धारित केली आहेत.

१. किनवट प्रकल्पातील आदिवासी विध्यार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा

अभ्यास करणे.

२. आदिवासी विध्यार्थ्यांच्या विकासासाठी राबवण्यात येणा-या शैक्षणिक सेवा सुविधाचा अध्ययन करणे.

३. आदिवासी आश्रम शाळेतील शिकणाऱ्या विध्यार्थीच्या समस्यांचा अभ्यास करणे.

४. आदिवासी आश्रमशाळेतील कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक समस्यांचा अभ्यास करणे.

५. आदिवासी आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थीच्या येणारा विविध समस्या सोडवण्यासाठी केलेला उपाययोजना अभ्यास करणे.

संशोधन प्रश्न:

१.किनवट प्रकल्पातील आदिवासी विध्यार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती समाधानकारक आहे का?

२. आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी राबवण्यात येणा-या शैक्षणिक योजनां चा अपुऱ्या आहेत का?.

३. आदिवासी आश्रम शाळेतील शिकणाऱ्या विदयार्थ्यांच्या सेवासुविधा कोणकोणत्या समस्या आहेत?

४. आदिवासी आश्रम शाळेतील कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांच्या सेवा सुविधाच्या समस्यांना सामोरे जावे लागते का?

५. आदिवासी जमातीच्या जलद विकासासाठी आदिवासी सेवा सुविधाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का?

संशोधनाची व्याप्ती

अ) योजनात्मक व्याप्ती

आदिवासींचा विकास घडवून आणण्यासाठी शासनामार्फत अनेक योजना राबविण्यात येतात. या योजनांची ढोबळ मानाने पाच गटात विभागणी केली जाते. ते म्हणजे

i) शैक्षणिक विकासाच्या योजना,

ii) शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या योजना,

iii) रोजगार व स्वयंरोजगार योजना,

iv) आर्थिक उन्नतीच्या योजना

v) सामाजिक विकासाच्या योजना.

या प्रत्येक गटांतर्गत विवीध उद्देश समोर ठेवून योजना राबविण्यात येतात. या पैकी शैक्षणिक उन्नतीच्या पाच व सामाजिक उन्नतीच्या दोन अशा एकूण सात योजनां पुरता हा अभ्यास मर्यादित आहे.

आदिवासी विकास योजना

शैक्षणिक विकासाच्या योजना

शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या योजना

रोजगार व स्वयंरोजगार योजना

ब) कालात्मक व्याप्ती :

शासना मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना सुरु होण्याचा कालावधी हा वेगवेगळा आहे, त्या मुळे संशोधन सुरु होतानां चे पाच वर्ष म्हणजेच २०१८-२०२३ पर्यंत चा कालावधी अभ्यासासाठी विचारात घेतला जाणार आहे. असे असले तरी ही अलिकडील अद्ययावत माहितीचा त्यात समावेश केला जाणार आहे.

क) क्रियात्मक व्याप्ती

शासनामार्फत आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी कल्याणात्मक योजना राबविल्या जातात. त्या पैकी निवडक शैक्षणिक योजनांचा अभ्यास केला जाणार आहे. आर्थिक व सामाजिक अंगाने अभ्यास करताना विविध पैलूंना महत्व दिले आहे. यांत प्रामुख्याने आदिवासी कुटुंबाचे उत्पनाचे स्त्रोत, उत्पन्नाचे प्रमाण, उपभोग खर्च, बचत, जमीन धारणा क्षेत्र, पिकांचे प्रकार अशा आर्थिक घटकांचा व शिक्षण, विवाह संस्था, कुटुंब नियोजन, राहणीमान, कुटुंबाचा आकार अशा सामाजिक घटकांचा अभ्यास स्वतंत्र पणे केला जाणार आहे. या मुख्य व अन्य घटकांना अनुसरून माहिती संकलित करून सांख्यिकीय विश्लेषण केले आहे व अन्वयार्थ स्पष्ट केला जाणार आहे.

नमुना निवड:

महाराष्ट्र राज्यात सद्यस्थितीत ३६ जिल्हे आहेत. २०११ च्या जणगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या नांदेड जिल्ह्यात असून त्यातील किनवट प्रकल्पात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण १८.६ टक्के इतके आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी किनवट प्रकल्पाची हेतु पुरस्सर पद्धतीने निवड करण्यात आली आहे.

अ) तालुक्यांची नमुना निवड:

आदिवासी विकास विभागा मार्फत आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात, त्यासाठी नांदेड जिल्हा किनवट प्रकल्पा अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील एकूण आदिवासी लोकसंख्ये पैकी किनवट प्रकल्पात १८. ६ टक्के लोक संख्या वास्तव्य करते, संशोधनासाठी किनवट प्रकल्पातील आदिवासीला प्राधान्य देऊन त्या अंतर्गत समाविष्ट

असलेली भोकर, किनवट, माहूर, हदगांव, हिमायतनगर, नांदेड इत्यादी तालुक्यांची निवड करण्यात आली आहे.

ब) लाभार्थीची नमुना निवड:

संशोधनाला सुरवात केली असतांना २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारी नुसार किनवट प्रकल्पांतर्गत सर्वच अनुदानित आणि शासकीय आश्रम शाळांची निवड करण्यात येणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार किनवट प्रकल्पातील भोकर, अर्धापूर, किनवट, माहूर, हदगांव, हिमायतनगर इत्यादी तालुक्यात एकूण शासकीय आश्रमशाळा १६ आहेत आणि निमशासकीय २२ आदिवासी आश्रम शाळेतील एकूण -- विद्यार्थीची सर्वेक्षणासाठी यादृच्छिक नमुना पद्धतीनुसार निवड करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या पडताळण्यासाठी सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक उन्नतीच्या योजनांचे प्रत्यक्ष लाभार्थी नमुना म्हणून विचारत घेतले जाणार आहे.

तथ्य संकलन पद्धती:

प्रस्तुत अभ्यासासाठी किनवट जिल्ह्यातील किनवट प्रकल्पाची निवडकेली आहे. संशोधनासाठी आवश्यक माहिती चे संकलना करिता प्राथमिक व दुय्यम संकलन पध्दती विचारात घेतल्या आहेत.

किनवट प्रकल्पातील आदिवासी

अ) लोकसंख्या :

प्राथमिक माहिती संकलन पध्दती शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सेवासुविधाचा मूल्यमापनात्मक अभ्यास (विशेष संदर्भ:- किनवट प्रकल्प)या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी किनवट प्रकल्पातील आदिवासी समाजाची पुढील प्राथमिक सामग्रीचा वापर करून माहिती संकलित केली.

निरीक्षण :

संशोधनासाठी प्रत्यक्ष आदिवासी वस्तीत जाऊन तेथील परिस्थितीचे निरीक्षण केले आहे आदिवासी समाजाचे राहणीमान, त्यांची वस्ती, घरे निवासस्थान, तसेच आश्रमशाळेतील पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृह, बोल, त्यांना सरकार कडून मिळणाऱ्या सोयीसुविधा यांचे प्रत्यक्ष निरीक्षण संशोधना दरम्यान केले जाणार आहे.

अनुसूची व मुलाखती व्दारे माहिती सामाजिक संशोधना मध्ये अनुसूची व मुलाखत ही पद्धत महत्वाची मानली जाते. आदिवासी समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती व त्यांना मिळणाऱ्या योजनांचे लाभ, त्यातील उणीवा व मूल्यमापन करण्यासाठी अनुसूची व प्रश्नावली व्दारे आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीची माहिती भरून प्रश्नांव्दारे वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व विकासाच्या योजना इत्यादी विषयी माहिती संकलित केली जाईल,तसेच शासकीय संस्था, आश्रमशाळेतील शासकीय अधिकारी,

कार्यालयातील अधिकारी, निरीक्षक व इतर संबंधित सेवकांशी चर्चा करून आदिवासी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, त्यांची फलश्रुती, योजना राबविताना येणाऱ्या अडचणी इत्यादी विषयी माहिती जमा केली जाणार आहे.

ब) व्दितीय माहिती संकलन पद्धती

प्राथमिक तथ्य संकलन शास्त्रीय संशोधनात महत्वाचे असले तरी त्या सोबत व्दितीय तथ्य संकलन देखील महत्वाची भूमिका बजावते. संशोधनाला माहितीचा आधार मिळावायासाठी आदिवासी विषयक मासिके, ग्रंथ, नियतकालिके, लेख, वर्तमानपत्रे, संकेतस्थळ (website) व संदर्भग्रंथ तसेच या अभ्यासाशी संबंधित अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, एम.फिल. प्रबंधिका, आदिवासी विकास विभागा मार्फत मिळालेले शासकीय दस्तावेज, अहवाल व सांख्यिकीय माहिती यातून संशोधना संबंधित माहिती संकलित केली आहे.

प्राथमिक व द्वितीय पद्धतीने मिळालेल्या माहितीचे संकलन करून त्याच्या विश्लेषणा साठी तथ्याचे वर्गीकरण, सारणीकरण, आलेख तयार केले आहेत. तसेच टक्केवारी, गुणोत्तरप्रमाण, वृद्धीदर इत्यादी संख्या शास्त्रीय साधनांचा अवलंब केला जाणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा

१. प्रस्तुत अभ्यास किनवट तालुक्यातील केवळ किनवट प्रकल्पा पुरता मर्यादित आहे.

२. आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या विध्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनाचा केवळ २०१८ ते २०२३ या पाच वर्षाचा कालावधीचा विचार केला जाणार आहे.

३. प्रस्तुत संशोधन निवडक शैक्षणिक शासकीय योजनां पुरता मर्यादित आहे.

नियोजित प्रकरण

प्रस्तुत संशोधनाची प्रकरण योजना पुढील प्रमाणे आहे.

१) प्रकरण पहिले प्रास्ताविक

या प्रकरणात आदिवासींची व्याख्या, त्यांचा इतिहास व “शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सेवा सुविधा चा मूल्यमापनात्मक अभ्यास” (विशेष संदर्भ:- किनवट प्रकल्प) हा विषयाशी संबधित संशोधन आराखडा मांडण्यात येणार आहे. यात संशोधनाचा विषय, महत्व, संशोधनाची उद्दीष्ट्ये, गृहीतक, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन पध्दती, नमुना निवड पद्धती, संशोधनाच्या मर्यादा व प्रकरण रचना या माहीतीचा समावेश केला जाणार आहे.

२) प्रकरण दुसरे- समाजकार्य संशोधन पद्धती व संदर्भ सहीत्याचा आढावा

या प्रकरणा मध्ये संशोधन विषयाशी निगडीत विविध साहित्याचा आढावा घेतला आहे. आदिवासी समाजाची सामाजिक, राजकीय व आर्थिक परीस्थिती, त्यांची उत्पत्ती, आदिवासी महिलांची परीस्थिती, आदिवासी साहीत्य, आदिवासी समाजासाठी राबविण्यात

येणाऱ्या विविध विकासात्मक योजना अशा विविध पैलूंनी झालेला अभ्यासाचा आढावा या प्रकरणात घेतला जाणार आहे. यात संशोधन विषयाशी निगडीत लेख, पुस्तके, अहवाल व एम.फिल. प्रबंधिका व पीएच.डी. संशोधन प्रबंध इत्यादीं मधील संदर्भाचा समावेश करण्यात येणार आहे.

३) प्रकरण तिसरे- आदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती

प्रस्तुत प्रकरणा मध्ये आदिवासी लोकसंख्या व त्यांची सामाजिक व आर्थिक परीस्थिती मांडण्यात येणार आहे. भारतातील आदिवासी लोकसंख्या तिचे ग्रामीण व शहरी विभाजन, आदिवासी लोकसंख्येच्या आकडेवारीतील स्वातंत्रोत्तर काळापासून ते आता पर्यंत होत आलेले बदल, साक्षरतेचे प्रमाण, स्त्री पुरुष प्रमाण आदिवासी लोकसंख्येची घनता, तसेच महाराष्ट्राची लोकसंख्या व किनवट तालुक्यातील आदिवासी लोकसंख्या व लोकसंख्ये विषयक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

४) प्रकरण चौथे- किनवट प्रकल्पातील शासकीय आदिवासी विकास योजनांचा आढावा

या प्रकरणा मध्ये आदिवासी विकास विभागाची स्थापना त्याची पार्श्वभूमी, आदिवासी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणात्मक योजना त्यांच्यावर आता पर्यंत झालेली तरतूद व खर्च व संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या निवडक सात योजनांची माहीती त्यांची उद्दिष्ट्ये, योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता, त्यांची कार्यपध्दती, शासकीय परिपत्रके व किनवट प्रकल्पात त्यांच्या वर करण्यात आलेला पाच वर्षाचा (२०१८ ते २०२३) अर्थसंकल्पीय खर्च व तरतूद याचा समावेश करण्यात येणार आहे.

५) प्रकरण पाचवे: तथ्य विश्लेषण

या प्रकरणा मध्ये किनवट प्रकल्पातील नमुना निवड केलेल्या आदिवासी आश्रमशाळेतील ५०० लाभार्थी कडून संकलित केल्या गेलेल्या कौटुंबिक, वैयक्तिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व शासकीय योजनां विषयीच्या माहीतीचे सविस्तर सांख्यिकीय माहितीचे आलेख व सारणीव्दारे विश्लेषण व सादरीकरण केले जाणार आहे आणि त्यांचा अन्वयार्थ स्पष्ट केला जाणार आहे.

६) प्रकरण सहावे- निष्कर्ष, समाजकार्य प्रारूप व शिफारशी.

प्रस्तुत प्रकरणात प्राथमिक माहितीच्या आधारावर मिळालेल्या माहीतीचे विश्लेषण करून त्याच्या आधारे वैयक्तिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व योजनां विषयी ठळक निष्कर्ष काढले जातील. तसेच प्रत्यक्ष लाभार्थीना भेटल्यावर त्यांच्या अडचणी व योजनेतील त्रुटी जाणून घेऊन त्यांच्या सुलभीकरणासाठी योग्यत्या शिफारशी सुचविल्या आहेत.

सारांश

भारतात अनेक जाती, धर्म व जमातीचे लोक राहतात त्यापैकी एक महत्वपूर्ण व जुनी जमात म्हणजे आदिवासी जमात होय. आदिवासींचा भारतीय राज्यघटनेत कलम ४६ अंतर्गत अनुसूचित जमात (Schedule Tribe) असा उल्लेख केलेला आहे. आदिवासींचा विकास घडवून आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासना मार्फत अनेक योजना राबविण्यात येतात. या योजना ढोबळ मानाने पाच गटात विभागण्यात येतात ते म्हणजे शैक्षणिक विकासाच्या योजना, शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या योजना, रोजगार वस्वयंरोजगार योजना, आर्थिक उन्नतीच्या योजना, सामाजिक विकासाच्या योजना. या प्रत्येक गटांतर्गत विविध उद्देश समोर ठेवून योजना राबविण्यात येतात. प्रस्तुत संशोधन किनवट तालुक्यातील किनवट प्रकल्पाच्या संदर्भात आदिवासी जमातीच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या शासकीय योजनांचे मूल्यमापनाच्या अभ्यासासाठी हाती घेतले आहे.

संदर्भग्रंथ सूची:

१. कोठारी संजय, (२०१२), महाराष्ट्रातील आदिवासी विकास, महाराष्ट्र – ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा, सेंटर फॉर इकोनॉमिक्स अॅण्ड सोशल स्टडीज्, अमरावती, पृ. १३०.

२. कार्यक्रम अंदाजपत्रक २००७-०८, आदिवासी विकास विभाग, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर, पृ. १.

3 आदिवासी विकास विभाग महारष्ट्र शासनयांच्या संकेतस्थळ.

४. कोठारी संजय, (२०१२), महाराष्ट्रातील आदिवासी विकास, महाराष्ट्र ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा, सेंटर फॉर इकोनॉमिक्स अॅण्ड सोशल स्टडीज्, अमरावती, पृ. १३२.

५. जनगणना २००१, http://www.censusindia.gov.in

६. आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका वर्ष २०११-१२, महाराष्ट्र शासन,पृ. ०७.

७. कुलकर्णी, पी.के. (२०१२), दलितांचे व आदिवासींचे समाजशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पृ. १८.

८. Constitution of India, Chapter 11, Government of India, p.185

9. मोरे माधव, आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन, पुणे २००६.

१०. संगवे विलास, आदिवासीचे समाजीक जीवन, पौपुलर प्रकाशन, मुंबई.

• संशोधक विध्यार्थी •

राजरत्न निवृत्तीराव पवार

• संशोधन मार्गदर्शक •

प्रा. डॉ. मेघराज ए. कपुरडेरिया

(सहयोगी प्राध्यापक)